पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/२६०/२०१५
दिनांक - ८/ १०/२०१५

प्रति,
मा.श्री./श्रीम. -------------------------------

सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- ४४

**विषय:- अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १४ /१०/२०१५ रोजी आयोजित केलेबाबत.. .**

**महोदय/महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १४/१० /२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक ७

दिनांक:- १४/१०/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

..................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १४/१०/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १०/०९/२०१५ ( दि. ०९/०/२०१५ रोजीची तहकूब सभा) रोजी घेणेत आलेल्या माहे सप्टेंबर २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ६) कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ. सो.६.०० मीटर रुंद रस्त्यास " हस्तीमल शेठ गादिया मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे<br>(दिनांक १४/१०/२०१५ रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक २ | मा.संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक १९ मधील बस टर्मिनल (मुकाई चौक) येथे आहे. त्या बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनल " असे नामकरण करणेत यावे.<br>( दिनांक १४/१०/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे.) |
| विषय क्रमांक ३ | अ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील पत्र क्र. अक्षेका/आ/२/कावि/७०९/२०१५ दिनांक २३/९/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा कुंडयामधील कचरा, रस्त्याच्या कडेस व सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा उचलणे व त्याची वाहतुक भोसरी स्थानांतरण केंद्र येथे खाली करणे अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकून पसरविणेचे कामाची बीले " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशीर्षावरुन खर्ची टाकण्यात येतात. सदर लेखाशीर्षावर सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. ५०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली असून त्यापैकी र.रु. ३१,११,३१९/- इतका खर्च झाला असून र.रु. १८,८८,६८१/- इतकी तरतूद दिनांक १०/९/२०१५ अखेर शिल्लक आहे. त्यामुळे " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशिर्षावर तरतूद अपुरी पडणार आहे.<br><br>तरी अ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडील " ठेकेदारी पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे " या लेखाशिर्षामधून ररु. १५,००,०००/- व " हॉटेल वेस्ट वाहतूक खर्च "या लेखाशिर्षामधून र.रु. १०,००,०००/- अशी दोन्ही मिळून एकुण र.रु. २५,००,०००/- इतकी तरतूद " कचरा उचलणे व हलविणे " या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०३ व अनुसूची प्रकरण ७ (२) मधील तरतुदीनुसार मान्यता देणेबाबत विचार करणे. |

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ४ | मा. जावेद शेख यांचा दिनांक २२/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>सफाई कर्मचारी कामाची वेळ सांभाळीत नाही. कामाच्या वेळेत नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित नसतात. तर आपल्या वैयक्तिक खाजगी कामांना प्राधान्य् देवून कामाचे वेळेत मुकादम/आरोग्य निरीक्षक यांना पूर्व कल्पना न देता बाहेर जातात. त्यामुळे सफाई कामावर परिणाम होतो. तरी सर्व सफाई कर्मचारी , हंगामी ठेकेदार व कायम यांचेसाठी बायोमेट्रिक हजेरी पध्दत सुरु करण्यात यावी. तसेच कुणी कर्मचारी कामाचे वेळेत काम सोडून खाजगी/वैयक्तीक कामासाठी बाहेर गेल्यास त्या कर्मचा-याची संपूर्ण दिवसाची गैरहजेरी लावण्याचा अधिकार मुकादम/ आरोग्य निरीक्षक यांना देणेबाबत विचार करणे. |
| विषय क्रमांक ५ | मा. सभापती यांचे परवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐनवेळचे विषय. |

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे ४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/२६० /२०१५
दिनांक : ०८/१०/२०१५